**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

पो. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर पिन कोड नं. ४२३ १०९

दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१/२५८७७२ फॅक्सः २५८७७०

जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/ 1987 /२०२४

दिनांक- 13 SEP 2024

प्रति,

मे.---------------------------------------------------

--------------------------------------------------------

--------------------------------------------------------

--------------------------------------------------------

विषयः- माहे- ऑक्टोबर २०२४ ते मार्च-२०२५ या कालावधीकरीता खोबरा पावडर खरेदी…दरपत्रक मागणी..

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सोबत परिशिष्टात नमूद तपशीलाप्रमाणे खोबरा पावडर दरपत्रक पध्दतीने खालील अटी-शर्तीस अधीन राहून खरेदी करावयाची आहे. त्यास अनुसरून आपण आपले दर खालील तक्त्यात भरून, आपले लेटरहेडवरील कव्हरींग पत्रात, सर्व अटी शर्ती मान्य असल्याचे नमूद करुन सादर करावे.

**अटी/शर्ती-**

१. दरपत्रकासोबत अदयावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/तत्सम शासकीय परवाना,GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt, अद्यावत FSSAI लायसन्स व पॅन कार्डची झेरॉक्स प्रत जोडावी.

२. सील दरपत्रकासोबत, स्वतंत्रपणे खोबरा पावडरचे प्रत्येकी १ किलो ग्रॅम वजनाचे चांगल्या दर्जाचा नमुना दि.१३/०९/२०२४ ते दि.२०/०९/२०२४ पर्यंत खरेदी विभागाकडे सादर करावा. नमुना नसलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

३. दरपत्रकासोबत सादर केलेल्या नमुन्याप्रमाणे पुढील कालावधीसाठी माल पुरवावा लागेल.

४. सोबतचे परिशिष्ठामध्ये आपले दर **सर्व कर,GST, GST-TDS, पॅकिंग व फॉरवर्डींग, वाराई तसेच शिर्डी येथील संस्थानचे भांडार विभागात पोहचचे वाहतूक खर्चासह प्रती क्विंटलचे दर सादर करावेत.**

५. पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे श्री साईबाबा मंदिराजवळील भांडार विभागामध्ये करावा लागेल.

६. आपले दरपत्रक मंजूर झालेस मालाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३ % इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम मालाचा व्यवस्थितरित्या पुरवठा केलेनंतर व पुरवठा कालावधी संपलेनंतर परत करता येईल. सदर रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

७. दरपत्रक मंजूर झालेवर रू.१००/- मात्रचे स्टॅम्प पेपरवर त्वरीत करारनामा नोटरी करून देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी आपणास आदा करावी लागेल.

८. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठाकालावधीत अगर पुरवठा कालावधी संपलेनंतर ही, पुढील वर्षाची खरेदीसंबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजूर केलेल्या एकूण परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा मालाची मागणी संस्थानकडून झाल्यास तीचा पुरवठा मान्य दरानेच करणे दरपत्रकधारकावर बंधनकारक राहील. त्याबाबत अलहिदा चलन पाठविण्यात येईल.

९. पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा आदेशात नमूद मालाचा पुरवठा हा एकदम करावयाचा नसून संस्थानचे गरजेप्रमाणे दरमहा मागणी चलन पुरवठादारास पाठविण्यात येईल. त्यामध्ये नमूद परिमाण इतकाच मालाचा पुरवठा करावा लागेल. पुरवठा आदेशात नमूद केलेले परिमाण (Quantity) ही अंदाजे रहाणार असून भक्तांच्या संख्येनुसार प्रत्यक्ष मागणी अवलंबून रहाणार आहे. त्यामुळे दरपत्रकात किंवा पुरवठा आदेशात नमूद सर्व परिमाण (Quantity) खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक रहाणार नाही.

१०. दरपत्रकात /पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणेच खोबरा पावडरचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

११. पुरवठा करीत असलेला माल संस्थानकडून Randomly Sample घेऊन स्विकारला जातो. तथापी सदर माल स्विकारलेनंतरही एखादा बॉक्स, लॉटखराब आढळल्यास तो स्वखर्चाने बदलून द्यावा लागेल.

१२. पुरवठा करण्यात आलेल्या खोबरा पावडरच्या, प्रत्येक लॉटची शासकीय किंवा शासन मान्यता प्राप्त लॅबकडून तपासणी केली जाईल अथवा गरजेनुसार संस्थान प्रयोगशाळा / जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा / NABL / केंद्र शासनाच्या / राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

१३. खोबरा पावडरचा पुरवठा हा शासन मान्यता प्राप्त लॅब रिपोर्टसह करावा लागेल.

१४. माल पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार मालाच्या गोणीवर Date of Packing, Weight and Best before Date चा स्पष्ट उल्लेख असावा.

१५. खोबरा पावडरचा पुरवठा अन्न सुरक्षा नियम २०११ व वैध मापन शास्त्रच्या तरतुदीप्रमाणे असावा. यामध्ये खालील बाबींचा उल्लेख असावा.
१.उत्पादकाचा FSSAI Lic No. २. Brand & Quantity ३. Lot No / Batch No & Date of Manufacturing ४. कायदयाप्रमाणे गुणवत्ता व मानके याविषयी हमी (Warranty) ५. **ISO Certified Brand**

१६. संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या मालाचे रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास सदर माल बदलून द्यावा लागेल. त्यादरम्यान संस्थानला बाहेरुन माल विकत घ्यावा लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेल्या मालाच्या किंमतीच्या ५ टक्के दंड देय असलेल्या कुठल्याही बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

१७. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेल्या खोबरा पावडरमध्ये भेसळ अथवा ते कमी प्रतीचे आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील. मालाचे पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade असावे.

१८. आपण पुरविलेल्या मालाचा रिपोर्ट FSSAI Standards नुसार न आलेस आपणावर संस्थानकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत आपली कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

१९. आपण पुरविलेला माल संस्थानने नाकारला व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून माल खरेदी करावा लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातुनही वसुल केली जाईल.

२०. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व करकपाती बिलातून करण्यात येतील.

२१. पुरवठा आदेशातील खोबरा पावडर मुदतीत पुरविली नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या खोबरा पावडरची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीतजास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या खोबरा पावडरची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२२. खोबरा पावडर पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे, अगरचलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे तो नाकारला गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणूनसंस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या आदेशा इतकामाल दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या मालासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाला राहील.

२३. दरपत्रकातील मंजूर दराने खोबरा पावडर पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने खोबरा पावडर पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा खरेदी प्रक्रीयाकरुन खरेदी करावी लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल अगर याबाबत संस्थान प्रशासनाने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२४. पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी दरपत्रकधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित

..०३/-

असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

२५. सदर दरपत्रकाचा वैधता कालावधी दरपत्रकाच्या अंतिम तारखेपासून ९० दिवसांचा राहील.

२६. खोबरा पावडरचा प्राथमिक पुरवठा कालावधी ऑक्टोबर २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत राहील. तथापि वरील अट क्रं.९ प्रमाणे पुढील पुरवठा कालावधी विचारात घेऊनच दरपत्रक सादर करावे.

२७. खोबरा पावडरचा वापर हा श्रींच्या प्रसाद भोजनासाठी बर्फी निर्मितीसाठी करण्यात येणार आहे. ही बाब विचारात घ्यावी.

२८. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अगर सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहाणार नाही.

२९. सिलबंद पाकिटातील दरपत्रक संस्थानचे आवक विभागामध्ये विहित मुदतीत जमा करावेत. पाकिटावर **"खोबरा पावडर खरेदी दरपत्रक- खरेदी विभाग"** असा स्पष्ट उल्लेख असावा.

३०. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३१. खोबरा पावडर पुरविलेनंतर साधारण ३० दिवसात बील आदा करण्याचा प्रयत्न राहिल. तथापि तांत्रिक कारणास्तव बील अदा करण्यास विलंब झाला तरी ही खोबरा पावडरचा पुरवठा थांबविता येणार नाही. सदर पुरवठयापोटी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून आगाऊ रक्कम (ॲडव्हान्स) दिली जाणार नाही.

३२. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता कोर्टाचे न्यायकक्षेत राहिल.

३३. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. दरपत्रकधारकाची कोणतीही अट/अटी श्री साईबाबा संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही, सशर्त दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

३४. दरपत्रक सादर करण्याची अंतीम दिनांक २० / ०९ /२०२४.

**खोबरा पावडर खरेदी दरपत्रक**

| अ.नं | मालाचा तपशिल | अंदाजे मागणी परिमाण | दर प्रती क्विंटल GST सह - सर्व कर व समावेशक खर्चासह | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | खोबरा पावडर – Desiccated Coconut Powder- Dry & ISO certified Brand- packing 25 kg carton/ Bag (1 kg Pack x 25 pcs) | ३१.२० क्विंटल | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

(गोरक्ष गाडीलकर, भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी